
# ओम साई
पॅथॉलॉजी लॅबोरटरी
कम्प्युटर्सराइज

हनुमान नगर, चौक, श्री हॉस्पीटलच्या बाजूला,
तिरुमाला कॉम्प्लेक्स, पुंडलीक नगर, औरंगाबाद.
फोन नं. 0240 : 3551702 मो. नं. 9860681196

दैनिक अजिंक्य
# केसरी
RNI.MAHMAR/2023/87479 www.ajinkyakesari.in

**सुविचार**
वागण्यात खोटेपणा
नसला की,
जगण्यात मोठेपणा
लवकर
मिळवता येतो.

। दैनिक । छत्रपती संभाजीनगर । बुधवार । २३ ऑक्टोंबर २०२४ वर्ष २ रे । अंक १३१ ला । पाने ४ । मुल्य ३ रुपये | Daily | Chhatrapati Sambhajinagar | Wednesday | 23 October 2024 | Volume No.2 | Issue No. 131 | Price 3 | Page 4

## आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष



**मुंबई :** विधानसभा निवडणुकांच्याच्या पार्श्वभूमीवर,मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पडावी.पैशांची देवाणघेवाण,मादक द्रव्य,मद्य विक्री व तस्करी,सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये.संशयास्पद प्रकरणी थेट व तत्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रीत करुन तेथेही योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

आयकर विभाग,राज्य उत्पादन शुल्क,सक्तवसूली व अंमल बजावणी,महसूल गुप्तवार्ता,केंद्रीय वस्तू व सेवा कर, राज्य वस्तू व सेवा कर, वस्तू व सेवा कर गुप्तवार्ता, सीमा शुल्क, राज्यस्तरीय बँकर्स समिती, अंमली पदार्थ नियंत्रण, वित्तीय गुप्तवार्ता विभाग;रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,तटरक्षक दल,रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल,भारतीय विमानतळ प्राधिकरण,नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग,आचारसंहिता कक्ष,मुंबई पोलिस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

## काँग्रेस-ठाकरे सेनेतील जागावाटपाचा तिढा बाळासाहेब सोडवतील?



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाकडून उमेदवारी जाहीर होण्याआधीच नाराज असलेले आणि उतावीळ झालेले स्थानिक नेते बंडखोरी आणि पक्ष सोडून जाण्याच्या धमक्या देताहेत. त्यातच पक्षश्रेष्ठींकडून नाराजांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि उबाठा शिवसेनेत अद्याप एकवाक्यता झालेली नाही. विदर्भातील जागांवर चर्चेचे घोडे अडले असून ठाकरे गटाने केलेला दावा मागे घ्यावा, अशी काँग्रेस नेत्यांची ठाम भूमिका आहे. राज्यातील महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा कायम असताना सोमवारी दिल्लीत काँग्रेसने सुमारे ९६ उमेदवारांवर शिक्कामोर्तब केले. त्यातील ६२ उमेदवारांची काँग्रेसची पहिली यादी मंगळवारी जाहीर होणार आहे. या जागांपैकी ५८ जागांबाबत कोणताही वाद नसून तिन्ही घटक पक्षांचे एकमत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संजय राऊतांवर जाहीर हल्लाबोल केल्यानंतर उबाठा गटाने आम्ही पटोले असतील तर चर्चेला बसणार नाही अशी भूमिका घेतली. त्यावर आता काँग्रेसने मवाळ भूमिका घेत जागावाटपाबाबत काँग्रेस व ठाकरे गटातील वाद मिटवण्याची जबाबदारी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर सोपवली आहे. थोरात आज उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशी चर्चा करणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी तीन वाजता पुन्हा एकदा महाविकास आघाडीचे नेते चर्चेला बसणार आहेत. त्यात जागावाटपाचा तिढा सुटला तर महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होईल. त्यानंतर तिन्ही पक्षांची पहिली यादी घोषित होणार आहे. दरम्यान, बाळासाहेब थोरात यांच्या एन्ट्रीनंतर तरी महाविकास आघाडीमधील जागावाटपाचा घोळ संपतो का? याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### सचिन वाझेला उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

मुंबई : महाविकास आघाडी सरकारच्या काळात शंभर कोटी रुपयांच्या खंडणी वसुली प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतरांविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून तुरूंगात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन मंजूर झाला आहे. देशमुख यांच्यासह अन्य आरोपी जामिनावर बाहेर आहेत, त्यामुळे सचिन वाझे यांनीही जामिनासाठी याचिका केली होती. राज्याचे माजी पोलिस महासंचालक परमबीर सिंग आणि बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझे यांनी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. यावेळी सचिन वाझेविरोधात १०० कोटी वसुली प्रकरणात गुन्हा देखील दाखल करण्यात आला होता.त्यानंतर वाझे यांनी मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. त्याच्या जामीन अर्जावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्या.भारती डांगरे यांच्या खंडपीठाने २३ ऑगस्टला निकाल राखून ठेवला होता. यानंतर आज त्यावर सुनावणी झाली असता वाझे यांना जामीन मंजूर करण्यात आला.

### राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश सुरु झाले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याचे चित्र होते. भाजप नेते आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज (दि. २२) जाहीर प्रवेश केला. त्यामुळे अजित पवारांना विदर्भात मोठे बळ मिळणार आहे. माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी आज राष्ट्रवादीत प्रवेश झालाय. त्यामुळे राष्ट्रवादीला विदर्भात बळ मिळणार असल्याचे मानले जाते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंदियात राष्ट्रवादीला बळ मिळणार आहे. राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला.

### फटाके महागल्याने आतषबाजीवर येणार मर्यादा!

मुंबई : दिवाळीच्या आनंदोत्सवात आकाश उजळून टाकणाऱ्या आतषबाजीला यंदा महागाईची झळ बसली आहे. विविध प्रकारच्या फटाक्यांच्या किमतीत १० ते ४० टक्क्यांपर्यंतची वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा दिवाळीत सर्वसामान्यांच्या खिशाला झळ बसणार आहे. दिवाळीसाठीची लगबग सुरू झाली असून खरेदीसाठी बाजारपेठा विविध वस्तूंनी सजल्या आहेत. नागरिकांमधील उत्साह लक्षात घेता फटाक्यांच्या विक्रीतून उलाढाल होण्याची शक्यता आहे; मात्र फटाका व्यवसायाला दरवाढीचे ग्रहण लागले आहे. तरीदेखील ग्राहकांचा फटाके खरेदीला उत्साह आहे. सुतळी बॉम्ब, बुलेट बॉम्ब, पोपट, लवंगी अशा आवाजांच्या फटाक्यांचे दर पाच ते १५ टक्क्यांपर्यंत वाढले आहेत.

नियमित वाचा
दैनिक अंजिक्य केसरी

## आत्मा योजनेच्या कापूस पिक शेतीशाळेतून मार्गदर्शन

**सोयगाव (अजिंक्य केसरी)**
**गोकुळसिंग राजपुत**

सोयगाव तालुक्यातील जंगला तांडा येथे तालुका कृषी अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्या मार्गदर्शनाखाली आज रोजी मौजे जंगलातांडा ता.सोयगाव येथे कापूस पिक शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती आजच्या शेतीशाळा वर्गात समाधान चौधरी कृषी पर्यवेक्षक फर्दापूर यांनी कापूस पिकातील कीड व रोग व्यवस्थापन व खत व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. हेमंत देशमुख कृषी पर्यवेक्षक यांनी पिक विमा योजना, गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदान योजना याविषयी मार्गदर्शन मार्गदर्शन केले.
सरला चव्हाण कृषी सहाय्यक यांनी कापूस पिकात सेंद्रिय खताचा वापर व त्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी सेंद्रिय



खात निर्मिती, कामगंध सापळ्यांचा वापर व किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली.
आजच्या शेतीशाळा वर्गात प्रगतीशील शेतकरी, शेतीशाळे अंतर्गत निवड केलेले शेतकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मौजे जंगलातांडा येथे आत्मा योजनेच्या कापूस पिक शेतीशाळेतून मार्गदर्शन तालुका कृषी अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्या मार्गदर्शनाखाली आज रोजी मौजे जंगलातांडा ता.सोयगाव येथे कापूस पिक शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती आजच्या शेतीशाळा वर्गात समाधान चौधरी कृषी पर्यवेक्षक फर्दापूर यांनी कापूस पिकातील कीड व रोग व्यवस्थापन व खत व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. हेमंत देशमुख कृषी पर्यवेक्षक यांनी पिक विमा योजना, गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदान योजना याविषयी मार्गदर्शन मार्गदर्शन केले.
सरला चव्हाण कृषी सहाय्यक यांनी कापूस पिकात सेंद्रिय खताचा वापर व त्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी सेंद्रिय खात निर्मिती, कामगंध सापळ्यांचा वापर व किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली.
आजच्या शेतीशाळा वर्गात प्रगतीशील शेतकरी, शेतीशाळे अंतर्गत निवड केलेले शेतकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## आदर्श आचारसंहिता पालनासाठी दक्ष रहावे-विकास मीना

**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** निवडणूक कालावधीमध्ये आदर्श आचारसंहितापालनासाठी सर्व पथक प्रमुखांनी ,सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दक्ष राहून कारवाई करावी,असे निर्देश आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आचारसंहिता कक्षामध्ये आज जिल्ह्यातील सर्व नऊ विधानसभा मतदार संघनिहाय आचारसंहिता नोडल अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, महानगरपालिका अपर आयुक्त रणजीत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, खनिकर्म अधिकारी किशोर घोडके, श्रीमती उपासे यांच्यासह जिल्ह्यातील नऊ मतदारसंघातील आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.



यावेळी सुचना देण्यात आल्या की, आचार संहिता अंमल बजावणीसाठी नियुक्त भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ पथके यांनी बस स्थानक, रेल्वे स्थानक, सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या वाहनात रोख रक्कम वाहतूकीबाबत तपासणी करावी. त्याचप्रमाणे संशयास्पद ठिकाणी अचानक क्षेत्रभेट देऊन तपासणी करावी. तपासणीची व्हिडिओग्राफी ,लेखी नोंदी असणे आवश्यक आहे. तपासणी केल्यानंतर प्रत्येक दोन दिवसांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भेटीचे नियोजन मतदारसंघनिहाय करावे. दिवाळी सणाच्या पार्श्वभुमीवर विविध ठिकाणी कपडे, भेटवस्तू किंवा इतर वस्तूचे वाटप करुन मतदारांना प्रलोभन दिले जाऊ शकते. याबाबतही योग्य ती खबरदारी या कक्षामार्फत नियुक्त अधिकारी कर्मचारी घ्यावी. विनापरवानगी पोस्टर, बॅनर याबाबत प्रचार होत असेल तर तात्काळ दखल घ्यावी. सी विजील या ॲपवर येणाचा तक्रारींचीही तात्काळ दखल घेण्यात यावी. योग्य ते पुरावे जतन करावे. आचारसंहिता पालन करत असताना योग्य ती खबरदारी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी घ्यावी, विविध क्षेत्रातील भेटीचे नियोजन, रोख रक्कम आढळून आल्यास करावयाचे कार्यवाही बाबत मार्गदर्शन या बैठकीमध्ये करण्यात आले.

## डॉ. आर. एन. लाहोटी कॉलेजमध्ये रोजगार सक्षमता प्रशिक्षण संपन्न



**सुलतानपुर (अजिंक्य केसरी)**
**स्वप्नील अवचार**

जीटीटी फाऊंडेशन पुणे आणि डॉ. आर. एन. लाहोटी कॉलेज ऑफ नर्सिंग, सुलतानपुर यांच्या संयुक्त विद्यमाने इस्टिट्यूटमध्ये आरोग्य क्षेत्राशी निगडीत शिक्षण संपादन करीत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी जीटीटी फाऊंडेशन यांच्या मार्फत तीन दिवशीय 'जीवन कौशल्य विकास व रोजगार सक्षमता प्रशिक्षण' कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना स्व:जाणीव, स्वतःची ओळख, ध्येय निश्चिती, संभाषण कौशल्य, श्रवण कौशल्य, समस्या निराकरण व निणऱ्य क्षमता कौशल्य, वेळेचे व कामाचे नियोजन, रुग्णालयातील नैतिकता, जबाबदारी व कर्तव्ये, योग्य रोजगार संधीसाठी सामाजिक माध्यमे व ई-मेल नैतिकता यांचा उपयोग व वापर, मुलाखत कौशल्ये व नैतिकता इत्यादी सर्व मुद्यांची सखोल व महत्वपूर्ण अशी माहिती विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक स्वरूपात जीवन कौशल्ये प्रशिक्षण क्षेत्रातील अनुभवी असणाऱ्या प्रशिक्षका मार्फत पुरविली गेली.

या प्रशिक्षण कार्यक्रमातून विद्यार्थी कौशल्येपूर्ण व्हावेत, त्यांच्या राहणीमानात व संभाषणात चांगले व सकारात्मक बदल व्हावे. तसेच रोजगाराच्या संधीसाठी ते स्वतः तयार असतील व रुग्णालयात हे सर्व गुण कौशल्ये वापरून त्यांच्या प्रगतीत भर पाडतील. ही या कार्यक्रमाची उद्देशप्राप्ती आहे. हा संपूर्ण कार्यक्रम संस्थाध्यक्ष डॉ. हेमराजजी लाहोटी साहेब यांच्या मार्गदर्शना अंतर्गत तसेच प्राचार्या रुजुला लाड मॅडम व सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने पार पडला.
तसेच प्रशिक्षक श्री अज़हर शेख यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. कार्यक्रमाचे आयोजन जीटीटी फाऊंडेशनचे प्रकल्प अधिकारी श्री. आकाश बोधक सर व छत्रपति संभाजी नगर विभाग प्रमुख श्री.रविंद्र बोरडे सर यांच्यामार्फत करण्यात आले होते.

## गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदार संघात मोठा राजकीय भूकंप

### गरुड झेप अकॅडमीचे संस्थापक प्रा.सुरेश सोनवणे आमदारकी साठी मैदानात...?

**खुलताबाद (अजिंक्य केसरी)**
**मच्छिंद्र घोरपडे**

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघांमध्ये मागील काही दिवसांपासून मोठमोठ्या हालचाली व घडामोडी घडत आहे. मागील काही महिन्यांपासून मोठमोठे नावे या मतदारसंघांमध्ये आपले नशीब आजमावणार असल्याच्या बातम्या रोज बघायला मिळत आहे. यामध्ये कोहिनुर शिक्षण संस्थेचे डॉ मजहर खान, डॉ ज्ञानेश्वर निळ, हरियाली फाउंडेशन संस्थांपक सतीश शुक्ला सर, विलासराव चव्हाण, वंचितचे गुलाम नबी, किरण पाटील डोणगावकर, जगनाथ बापु खोसरे, भाऊसाहेब शेळके, देवयानी ताई डोणगावकर यांच्या सह अनेक उमेदवारांच्या नावाची चर्चा सुरु आहे. मात्र कालपासून डॉ सुरेश सोनवणे यांनी निवडणूक लढविणार असल्याच्या पोस्ट वायरल झाल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी हालचाल झाल्याचे विशेषकांचे मत आहे. विधानसभेची निवडणूक जाहीर झाली असून. त्या अनुषंगाने सध्या सर्वच राजकीय पक्ष जोमाने तयारीला लागले आहेत. राजकीय नेते मतदारसंघातील लहान सहान सरसकट सर्व गाव, तांडे, वाड्या वस्त्याचा आढावा घेत आहेत. याचबरोबर आदर्श आचारसंहिता लागू होण्यापूर्वी संबंध मतदारसंघामध्ये ठीक ठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका, निधी, आश्वासने अशा सर्व प्रकारच्या राजकीय नीती वापरून मतदारांच्या मनात घर करण्याचे कसोशीने प्रयत्न उमेदवारांकडून केले गेले आहे. अशातच २२ ऑक्टोबर पासून समाजमाध्यमांवर गरुड झेप अकॅडमी चे संस्थापक सुरेश सोनवणे यांनी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघ निवडणूक लढवणार असल्याच्या पोस्ट व्हायरल झाल्यामुळे मतदार संघात गाव चावड्यावर गप्पा मारायला नागरिकांना रंजक विषय मिळाला आहे. मागील काही महिन्यांपासून समाज माध्यमांवर नागरिकांकडून सुरेश सोनवणे यांनी गंगापूर खुलताबाद विधानसभेसाठी उमेदवारी घ्यावी अशी चर्चा सुरु होती. आणि अचानक सोनवणे समर्थकांकडून सोनवणे आमदारकी साठी मैदानात उतरणार असल्याच्या पोस्ट वायरल झाल्यामुळे ही विधानसभा २०२४ निवडणूक रंगतदार व चूरशीची होणार असणार असल्याच्या चर्चा दोन्हीही तालुक्यातील नागरिकांमध्ये चावड्यांवर रंगत आहे. यामध्ये कोण बाजी मारणार हा यक्षप्रश्न असला तरी मात्र ही लढत खूप आव्हानात्मक व



रंगतदार होणार असल्याचे राजकीय विश्लेषक वाघ यांचे मत आहे.

# संपादकीय...

## जाणत्यांनी ती जबाबदारी स्वीकारून पार पाडायला हवी...

दाभेदाच्या राजकारणामुळे समाज विघटनाच्या उंबरठयावर उभा राहिल्याचा धोका सातत्याने वर्तवला जातो. त्याच आशयाच्या भावना अभिनेते ऋषिकेश जोशी यांनी व्यक्त केल्या. अस्मिता टोकदार झाल्याचा अनुभव येतो. त्यामुळे विनोदी लेखनावर मर्यादा आल्या आहेत, असे ते म्हणाले. विनोदीच नव्हे तर सर्वप्रकारच्या लेखनावर आणि भावना प्रगटीकरणावर मर्यादा आल्याचे मत साहित्यिक क्षेत्रात व्यक्त होते.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याची खंत जाणते विविध मार्गांनी व्यक्त करतात. विशेषतः समाज मध्यमांचा वापर यात मोठ्या प्रमाणात केला जातो. लोकांची मती गुंग व्हावी इतका मजकुराचा पाऊस तिथे पडतो. अस्मितांचे राजकारण जोरात सुरू आहे. कळत-नकळत अनेक ठिकाणी भेदाभेद चिकटवले जाताना दिसतात, पण या प्रकारच्या राजकारणाच्या समाज मनावर होणाऱ्या परिणामांकडे अस्मितांचे राजकारण करणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असतील का? यामुळे माणसांची मने खराब होतात.

तरुणांची माथी भडकतात. भावनांचा अतिरेक झाला तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका वाढतो. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. अशा वातावरणाची किंमत समाजच मोजतो, याचीच जाणीव सर्वांना होण्याची गरज आहे. अस्मिता टोकदार बनवल्या जात असाव्यात का? वैयक्तिक आणि राजकीय स्वार्थ साधण्यासाठी असे घडत असेल का? अस्मितेच्या आगीवर पोळी भाजून घेण्याचा अस्थानी उद्योग समाजाच्या अनुभवास येतो. तथापि असे घडू न देणे लोकांच्याच हाती आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे.

'वसुधैव कुटुंबकम' ही संस्कृती लोकच पुढे नेऊ शकतात. त्यांनी ठरवले तर ते कोणत्याही प्रकारच्या स्वार्थाला लांब ठेऊ शकतील. सुजाण माणसे विचारशील असतात. ते समाजाच्या वाटचालीला दिशा देऊ शकतात. समाजाची सहिष्णुता कायम ठेऊ शकतात. टोकदार अस्मितांच्या दुष्परिणामांची जाणीव लोकांना, विशेषत: तरुणाईला करून देऊ शकतात. युवांच्या अंगभूत ऊर्जेचा वापर समाज स्वास्थ्यासाठी व्हावा, असे प्रयत्न करू शकतात. जाणत्यांनी ती जबाबदारी स्वीकारून पार पाडायला हवी.

# यश म्हणजे काय..!



*तहान ज्याला लाटेची असते*
*थेंबाने त्याच पोट भरत नाही*
*हरणार तो अनेकदा, पण*
*जिंकल्याशिवाय रहाणार नाही*

ही म्हण सर्वांनी ऐकलेली आहे. यश म्हणजे काय तर एखादी गोष्ट ठरवून मिळवणे. आपण ठरवलेले धैर्य पूर्ण करणे म्हणजे यश मिळवणे होय. यश नेहमी वैयक्तिक असते. आपल्याला किंवा प्रत्येकाला वेळ ही सारखीच मिळत असते. पण मिळालेल्या वेळेचा जो योग्य वापर करतो तोच यशस्वी होतो. जेव्हा तुम्ही तुमचे ध्येय, उद्दिष्ट गाठता तेव्हा यश मिळते. जे यशस्वी आहेत त्यांनी त्यांच्या जीवनात आणि करिअरमध्ये त्यांच्या सर्वात मोठी इच्छा साध्य करण्यासाठी काम केलेल असते किंवा सध्या ते त्या क्षेत्रात कार्यरत असेलही पण यशाचा अर्थ काय याविषयी व्यक्तींना अनेकदा भिन्न समज असतात. यश ही अशी गोष्ट आहे की ती केवळ आपली आपणच अनुभवू शकतो आणि जर आपल्याला जगाला आपला आत्मविश्वास सिद्ध करावयाची गरज भासत असेल तर याचा अर्थ आपल्यात आत्मविश्वास नाही. कारण एखादी गोष्ट सिद्ध करण्याची किंवा यश म्हणजे काय हे समजून घेताना माणसाच्या मानसिकतेचे दोन प्रकार समजून घ्यावे लागेल. जिथे यशाची वृत्ती आणि पराभूतीची किंवा पराभवाची भीती असते. मनासारखे यश मिळणे किंवा कितीही प्रयत्न करूनही अपयश पदरी आले तरीही जो मनातून ठरवतो तो सतत विजेताच रहातो. तो विजेता स्वतःला मानतो. जर वृत्ती पराभूतीची असेल तर कितीही यश मिळवले तरीही अशी माणसे स्वतःला पराभूतच समजतात. कधीही आनंदी होत नाही. समाधानी होत नाही. स्वतः चांगली काम करत नाही. इतरांवर प्रेम करू शकत नाही. इतरांच्या कामी पडत नाहीं. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काय करायल ा हवे. तर केवळ आपण परीक्षेत चांगले मार्क्स मिळवून, चांगली नोकरी मिळणे, किंवा स्वतःच्या बळावर भरपूर पैसे मिळवने असं म्हणता येत नाहीं. नोकरीं, पैसे, चांगले मार्कस म्हणजे खरं यश नसतं. यश ही वृत्ती आहे. ती पास, नापास, मार्क पैसे यावर अवलंबून नसते. जीवनातील यश आणि शाळेतल यश याचा काही संबंध नसतो. तुम्ही भरपूर शिकले. भरपूर पैसा कमावल ा. स्वतः जवळ गाडी, बंगला, सर्व येशो आराम असूनही बरीच माणसे हें समाधानी दिसून येत नाहीं. असं का तर त्यांची इतरांबरोबर स्पर्धा सुरु असते. इतरांकडे ज्या सुखसुविधा आहे त्या आपल्याकडे ही असावं. ही भावना मनाला समाधानी राहू देत नाहीं. सतत मनात इतरांना घेऊन पुढे जाण्याची पैज लागलेली असते. मात्र आपण जे काम आपल्याला मनापासून करायला आवडते ते काम करत असतांना जो आनंद मिळतो. जे समाधान मिळते, ते म्हणजे आपले यश आहे. मग ते शिक्षणाबद्दल असू शकते, निवडलेल्या बिझनेसबद्दल किंवा साहित्य क्षेत्र अशा बऱ्याच क्षेत्राचा उल्लेख आपण करू शकतो. आपल्या आवडीनुसार, आपल्या इच्छेनुसार आपण कार्य करत आहोत आणि त्यात मिळणार यश आपल्यासाठी खूप महत्वाच ठरते. पण आपल्याला न आवडत्या एखादया क्षेत्रात जेव्हा पदार्पण करतो तेव्हा त्यामध्ये मिळालेलं यश हे आपल्याला समाधानकारक ठरत नाही. आपल्याला त्यामध्ये कितीही यश मिळालं तरी सुद्धा आपण आनंदी राहत नाही. बरेच विद्यार्थी दहावी बारावी मध्ये ९८ टक्के गुण घेऊन पास होतात मात्र म्हणाव तसे आनंदात दिसत नाही. बरेच विद्यार्थी आत्महत्या करतात. आत्महत्या करण्याच कारण म्हणजे कमी मार्क्स किंवा जास्त मार्क असे होऊच शकत नाही. कोणी तरी आपल्यापेक्षा पुढे गेलेलं आहे. किंवा या पेक्षा वेगळं ही कारण असू शकते. जीवनात जिद्द संयम आणि प्रामाणिकपणा असेल तर आपले अस्तित्व कोणी संपवू शकत नाही. पण नेमकं यश म्हणजे काय त्यांना हेच कळत नाही. यश या मध्ये आपण आपला विचार करायला हवा. आपली तुलना इतरांबरोबर करता कामा नये. आपली आवड वेगळी इतरांची आवड वेगळी हे प्रथम स्वतःला समजून सांगता आले पाहिजे. आपण आपल्या क्षेत्रात आपल्या वेगानुसार पुढे जाता आलं पाहिजे. आपला मित्र दुसऱ्या क्षेत्रामध्ये भरपूर पैसा कमवत आहे म्हणून आपणही त्या क्षेत्रात जाणार हे योग्य नाही. कारण आपला मित्र ज्या क्षेत्रात काम करतो तो त्याच्या आवडीनुसार काम करतो त्याला ते क्षेत्र आवडते म्हणूनच तर भरपूर पैसा कमवत आहे, यश मिळवत आहे. हे अगोदर आपल्याला समजलं पाहिजे. आपण आपल्या आवडत्या क्षेत्रात जेव्हा काम करतो त्यावेळी आपला आनंद हा द्विगुणित असतो आणि आपल्या कामाचा वेग सुद्धा यामुळे आपल्या कामात नीटनेटकेपणा येतो. आपल्या कर्माचा, आपल्या कार्याचा आलेख हा वाढत जातो. आपण यशाचा आपल्या प्रगतीचा विचार सुद्धा केला नाही तरी सुद्धा नकळत आपल्या वाटेला यश येते. सतत आपल्याला आवडणाऱ्या गोष्टीविषयी आवडणाऱ्या क्षेत्रांविषयी शिकत राहिलं तर आपल्या कामांमध्ये नीटनेटकेपणा कामामध्ये स्पीड सुद्धा येते. आपण आपल्या कामाच्या क्षेत्राशी व इतरांशी आपल्याला जुळून घेता येते. बऱ्याच गोष्टी शिकताना त्रास होत नाही. म्हणून सतत आपल्याला जे आवडते जे कराव वाटते. मनापासून ते आपण केलं पाहिजे आपल्या आयुष्याचे निणऱ्य आपण स्वतः घेतले पाहिजे. आपण इतरांच मार्गदर्शन घ्याव मात्र निणऱ्य हा आपलाच असला पाहिजे. त्या निणऱ्यावर आपण ठाम असल पाहिजे. 'यश' आपल्यापासून दूर राहणार नाही तर धावत आपल्या जवळ येईल. सवडीने नव्हे तर आवडीने आवडणारे काम केले पाहिजे.

*संघर्ष सुद्धा त्यांनाच निवडतो*
*ज्यांच्यात लढण्याची ताकद असते*
*जे संघर्षाला घाबरत नाही*
*त्यांच्याच वाटेला 'यश' येते*

**-सौ. चैताली संगोपाल वरघट**
मूर्तिजापूर, जि अकोला

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा



इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षीत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निणऱ्य इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजांरांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हल क्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## इच्छा मरण




असाध्यरोग ग्रासला
शरीरा खग्रास ग्रहण
अन्नपाणी वर्ज्य केले
कठीण ते श्वासगृहण

मृत्यु शय्येवरी सुध्दा
सुखद आशा किरण
आत्मविश्वास करतो
आजाराचे चिर हरण


मृत्युंजय जप करतो
शंभूचे करतो स्मरण
आपल्या हाती शून्य
अगतिकताविस्मरण

तांबुला असते जागा
जरीतुडुंब करे जेवण
वाटते कुणीतरी द्यावे
मिळावे अमृत द्रावण
आसवांच्या प्रवाहाले
अडवते निश्चय धरण
कसाजाऊ देऊ जीव
अति अवघड धोरण

जीव लागे जीवावरी
जगण्या कैक कारण
मुश्कीले मिळे जीवन
का त्यागतो अकारण

पचनी अजूनि पडेना
पर्याय तो इच्छामरण
आपल्या हाते रचावे
कसे हो आपले मरण

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६...




## साखर कारखानदारीत परिवर्तन केले, आता राजकीय परिवर्तन करणार- सतीश घाटगे

**घनसावंगी (अजिंक्य केसरी) :** समृद्धी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचा उस बांधावर पडू नये, त्यांच्या उसाला न्याय आणि चांगला भाव मिळावा, म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी (दि. २२) समृद्धीच्या १० हजार मे. टन गाळप क्षमतेच्या विस्तारीकरण प्रकल्पाचा हजारो ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांच्या हस्ते मोठ्या भूमिजन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी सतीश घाटगे यांनी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्धार पुन्हा एकदा जनतेसमोर जाहीर केला. ज्या पद्धतीने साखर कारखानदारीत 'समृद्धी'ने परिवर्तन केले, उस उत्पादक शेतकऱ्यांना भयमुक्त केले. त्याच पद्धतीने जनतेच्या साथीने आगामी विधानसभा निवडणूक घन सावंगीत राजकीय परिवर्तन करणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अंबड - घनसावंगी तालुक्यात उसाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या काळात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच शेतकऱ्यांना भयमुक्त होऊन उसाची लागवड करता यावी म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निणऱ्य घेतला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, उसतोड कामगार व उसतोड यंत्रणेतील कामगारांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. विस्तारीकरणानंतर समृद्धीची प्रती दिन गाळप क्षमता १० हजार मे. टन



आहे. हा प्रकल्प नोव्हेंबर-२०२५ पर्यंत उभा करण्याचा प्रयत्न समृद्धी कारखाना करणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास विजय कामड, गौतम गोलेच्छा, शिवाजीराव बोबडे, बालाजी खोजे, भगवान बर्वे, बाळासाहेब बोरकर, पांडुरंग भांगे, अरुण घुगे, शिवाजीराव कटारे , शिवाजीराव कंटूले, शिवाजी नाना मोरे, राहुल कणके, नामदेव ढाकणे, पांडुरंग खटके, रामेश्वर माने, सर्व संचालक मंडळ, कारखान्याचे सर्व विभागाचे अधिकारी, भाजपचे सर्व नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीचे उमेदवार विलास संदीपानराव भुमरे यांचे पैठणमध्ये शक्तिप्रदर्शन

### ही विधानसभा आपणच जिंकणार असल्याचा विलास भुमरे यांचा ठाम निर्धार!

# पैठण तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश






**पैठण (अजिंक्य केसरी)**

**अभिषेक चन्ने**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचो रणाशिंगा फुंकल्यानंतर प्रथमच पैठण शहरांत हजारो कार्यकर्त्यांच्या उपास्थितीत महायुतीचा महामेळावा पैठण शहरातील माहेश्वरी भक्त निवासाच्या सभागृहात मंगळवारी (दि.२२) आयोजित करण्यात आला. यावेळी महायुतीचे उमेदवार विलास संदीपानराव भुमरे यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह जोरदार शक्तिप्रदर्शन केले.ही विधानसभा आपणच जिंकणार असल्याचा ठाम निर्धार यावेळी विलास भुमरे यांनी व्यक्त केला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना महायुतीचे उमेदवार विलास भुमरे म्हणाले की, शेतकऱ्याला या महायुती सरकारने वीज, कर्जमाफी केली, गाय गोठे शेतकऱ्यांना दिले. विहिरी दिल्या, लाडकी बहीण, लाडके भाऊ योजना राबविली. हे सरकार देणारं आहे घेणारं नाही असे सांगत त्यांनी उपस्थितांना धनुष्यबाण या निशाणीवर मतदान करण्याचे आवाहन केले. महायुतीच्या कार्यकाळात साडेसहा हजार घरकुल आपण या पैठण विधानसभा मतदार संघात मंजूर केले. नाथ मंदिराचा विकास केला. संत ज्ञानेश्वर उद्यानाचा कायापालट केला. पंढरपूरात भक्त निवासचे काम प्रगती पथावर आहे. त्यामुळे विकासाच्या जोरावर आपल्याला या निवडणुकीला सामोरे जात आपल्याला जिंकायचे आहे आणि आपल्याला सर्वांना सोबत आणि विश्वासात घेऊन काम करायचे आहे. असे आवाहन विलास भुमरे यांनी केले. या मेळाव्यात शेकडो कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर, खासदार संदीपान भुमरे यांच्यावर विश्वास ठेऊन शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी सर्वांचे पक्षात स्वागत आणि अभिनंदन विलास भुमरे यांनी केले. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आपल्याला पूर्ण जोमाने काम करायचे आहे यासाठी तुमची साथ आवश्यक असल्याचे विलास संदीपान भुमरे यांनी आवाहन केले. यास पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ही विधानसभा पण आपणच जिंकू असा ठाम निर्धार केला. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश सचिव अप्पासाहेब निर्मळ, रवींद्र शिसोदे, जितू परदेशी, शिवसेना जिल्हा संघटक पुष्पा गव्हाणे, नंदू काळे, गजानन ठाकूर, माजी नगरसेवक अजीम भाई, दादा पाटील बारे, ज्योती काकडे आदी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

### २९ ऑक्टोबर रोजी भरणार उमेदवारी अर्ज

पैठण विधानसभा मतदार संघ,११० महायुतीचे अधिकृत उमेदवार विलास संदीपानराव भुमरे हे २९ ऑक्टोबर रोजी असंख्य महायुती कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी पैठण विधानसभा क्षेत्रातील लाखो समर्थक पैठण शहरांत दाखल होणार असुन महाहुतीचे उमेदवार विलास भुमरे हे आपले शक्तिप्रदर्शन करतील. उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीचे सर्व पदाधिकारी तसेच प्रत्येक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महायुतीचे उमेदवार विलास संदीपान भुमरे यांनी केले आहे.

### विविध सर्कलचा महामेळावा

पैठण तालुक्यातील पैठण शहर, आपेगाव सर्कल, पिंपळवाडी सर्कल च्या महायुती कार्यकर्ता मेळाव्यात शेकडो कार्यकर्त्यांनी ११०, पैठण विधानसभा मतदार संघ, महायुतीचे अधिकृत उमेदवार विलास संदीपानराव भुमरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना पक्षात प्रवेश केला. तर पैठण तालुक्यातील पाचोड सर्कल, दावरवाडी सर्कल, विहामांडवा सर्कलचा महायुती कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संपूर्ण सर्कल मधील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पैठण शहरातील ११ प्रभागातील कामे खासदार संदीपान भुमरे यांच्या प्रयत्नामुळे झाली. आता आगामी काळातही या पैठण विधानसभा मतदार संघांचे महायुतीचे अधिकृत उमेदवार विलास भुमरे यांच्या सक्षम नेतृत्वातून होईल असा विश्वास यावेळी शिवसेना जिल्हा संघटक पुष्पा गव्हाणे, नंदू काळे, गजानन ठाकूर, माजी नगरसेवक अजीम भाई, दादा पाटील बारे आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

## थो । ड । क्या । त

### वेतन देयके आज(दि.२३) व उद्या (दि.२४) कोषागारात सादर करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** आहरण संवितरण अधिकाऱ्यांनी आपापल्या अधिनस्त वेतन देयके ही बुधवार दि.२३ व गुरुवार दि.२४ रोजी कोषागारात सादर करावीत असे आवाहन उपसंचालक तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी शेखर कुलकर्णी यांनी केले आहे. वेतन देयके व सण अग्रिमाची देयके या कालावधीत दाखल करावीत. दि.२६ ते २९ या कालावधीत कोषागाराची संगणकीय प्रणाली बंद राहणार असुन त्याआधी आपापल्या कार्यालयाची वेतन देयके कोषागारात जमा करावी असे उपसंचालक कुलकर्णी यांनी कळविले आहे.

### उमेदवारांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशन प्रक्रियेचे प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशन प्रक्रियेबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करण्यात आले.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी यावेळी उपस्थित राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशनाबाबत माहिती दिली. नामनिर्देशन प्रक्रियेवेळी आवश्यक दाखले व कागदपत्रे, विविध प्रतिज्ञापत्रे, त्यांचे नमुने, नामनिर्देशन अर्ज भरतांना घ्यावयाची खबरदारी, प्रस्तावकांचे निकष, उमेदवारीचे निकष, राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी द्यावयाचे विविध प्रमाणपत्रे याबाबत माहिती देण्यात आली. तसेच अनामत रक्कम, ऑनलाईन सुविधा इ.बाबत मार्गदर्शन करण्यात आले. नामनिर्देशन पत्र भरतांना संबंधित निवडणूक निणऱ्य अधिकाऱ्यांकडे एक सुविधा कक्ष असून त्या कक्षातही ही माहिती व माहिती पुस्तिका आदीबाबत माहिती उपलब्ध असेल असेही स्पष्ट करण्यात आले. उमेदवारी अर्ज भरतांना बँक खाते, मतदार यादीतील नाव व उमेदवार मतदार संघाबाहेरील मतदार असल्यास तेथील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. प्रस्तावक मात्र मतदारसंघातील असणे आवश्यक आहेत, अशा विविध पैलूंवर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शंकानिरसन केले. विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच संभाव्य उमेदवारांचे प्रतिनिधी या प्रशिक्षणात सहभागी झाले.

### मतदान व मतमोजणी कालावधीत मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद

**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** विधानसभा निवडणूक २०२४ ची निवडणूक प्रक्रिया संपूर्ण जिल्ह्यात सुव्यवस्थित पार पडावी व कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी मतदान व मतमोजणी कालावधीत मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. त्यानुसार संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मतदानाच्या अगोदरच्या आधीचा दिवस दि.१८ नोव्हेंबर सायंकाळी ६ वाजल्यापासून पुढे, मतदानाच्या आधीचा दिवस दि.१९ नोव्हेंबर संपूर्ण दिवस व मतदानाचा दिवस दि.२० नोव्हेंबर संपूर्ण दिवस तसेच मतमोजणीचा संपर्ण दिवस दि.२३ नोव्हेंबर रोजी कोरडा दिवस घोषीत करुन मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद राहतील,असे कळविण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### प्रतिबंधात्मक आदेश जारी

आगामी काळातील सण, उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ३७(१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. दि.२ नोव्हेंबर पर्यंत हे आदेश लागू असतील. या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र वापरण्यास, दाहक स्फोटक पदार्थ बाळगण्यास, प्रक्स्होभक भाषणे, असभ्य वर्तन करण्यास, प्रतिमा, आकृत्या इ. चे प्रदर्शन करण्यास इ. कृत्य करण्यास तसेच पाच किंवा पाचापेक्षा अधिक व्यक्तिंना विनापरवानगी एकत्र येणास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशातून कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अन्य सक्षम अधिकारी यांना वगळण्यात आल्याचेही आदेशात नमूद आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.



नॅशनल स्टॉक एक्स्चेंजमध्ये आयोजित ह्युंदाई मोटार इंडिया लिमिटेडच्या सूचीकरण सोहळ्यावेळी (डावीकडून) श्री. वांगडो हुर (मुख्य वित्तीय अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक, ह्युंदाई मोटर इंडिया लि मिटेड), श्री. गोपालकृष्णन सीएस (मुख्य उत्पादन अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक, ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड), श्री. जयून चांग (अध्यक्ष) आणि सीईओ, ह्युंदाई मोटर कंपनी), श्री. युइसुन चुंग (कार्यकारी अध्यक्ष, ह्युंदाई मोटर समूह), श्री. उनसू किम (व्यवस्थापकीय संचालक, ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड) आणि श्री. तरुण गर्ग (मुख्य परिचालन अधिकारी आणि पूर्णवेळ संचालक उपस्थित होते.

## दौलताबाद पोलिसांनी हातभट्टी दारुचा अड्डा केला उध्वस्त




**दौलताबाद (अजिंक्य केसरी) :** हद्दीतील आसेगाव तालुका गंगापूर येथील साठवण तलावाचे बांधावर काही जण हातभट्टी दारूचा अडा चालवत असल्याची माहिती दौलताबाद पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक कृष्णा घायाळ, पोलीस अंमलदार महेश घुगे, राठोड यांनी घटनास्थळी जाऊन छापा टाकला असता त्याठिकाणी अरुण उत्तम अहिरे वय ४५ वर्ष रा.आसेगाव व मच्छिंद्र अशोक अहिरे वय ५२ वर्ष रा.आसेगाव तालुका गंगापूर हे दोन्ही गावठी दारु गाळत असल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी गावठी दारु तयार करण्याचे अंदाजे ४०० लिटर सडके रसायन किं.अंदाजे १६०००/- चे सडके रसायन पंचासमक्ष जागेवर नष्ट करण्यात आले. दोन्ही आरोपीविरुद्ध दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस अंमलदार बी एल अहिरे हे करत आहे.

## आनंद दिवाकर चक्रनारायण पालि विषयात नेट उत्तीर्ण



**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** लेखक कवी आनंद दिवाकर चक्रनारायण हे पहिल्याच प्रयत्नात पालि विषयात नेट उत्तीर्ण झाले असून मुंबई विद्यापीठ पालि विभागातील एम.ए. नियमित विद्यार्थ्यांमधून ते एकमेव उत्तीर्ण झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसी नवी दिल्ली मार्फत देशभरातील विद्यार्थ्यासाठी प्राध्यापक पदाची पात्रता आणि पीएच डी प्रवेशासाठी नेट परीक्षा घेण्यात येते. यावर्षी पालि विषयात या पात्रतेसाठी अत्यंत वरचा टक्का गेला. नुकताच केंद्र शासनाने पालि भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा आणि हा निकाल एक सुवर्णयोगच म्हणावा लागेल त्यांच्या ह्या यशाबद्दल अखिल भारतीय भिक्खू संघाचे अनुसंघनायक पुज्य भदंत बोधिपालो महाथेरो, नीलिमा बबन कांबळे, आचार्या डॉ. कमलताई गवई, कीर्तीताई अर्जुन, पद्मश्री डॉ सुखदेव थोरात, डॉ यशवंत मनोहर, माजी कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे, डॉ योजना भगत, डॉ निरज बोधी, प्राचार्या सुर्यकांताताई गाडे, डॉ प्रदीप आगलावे, राजेश ढाबरे, प्रा विजयकुमार गवई, डॉ म सु पगारे, प्राचार्य डॉ शंकर अंभोरे , डॉ प्रफुल्ल गडपाल , प्राचार्य डॉ कमलाकर पायस डॉ एम डी शिरसाट मा. प्राचार्या जॅकलीन स्मिथ-डोळस, डॉ रेखा मेश्राम, आदींनी अभिनंदन केले आहे.

# लोकशाहीमुळे मिळालेल्या अधिकार आणि कर्तव्यांबाबत युवकांनी जागरूक असावे - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी





**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** आपल्या आयुष्यात व सामाजिक जीवनात मिळणाऱ्या विविध सोई, सुविधा आपले शिक्षण, रोजगार यासारख्या बाबी प्राप्त करण्यात तसेच आपल्याला मिळालेले अधिकार आणि कर्तव्य हे सगळे लोकशाहीमुळे मिळालेले असून त्यासंदर्भात युवकांनी जागरुक असावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

विधानसभेच्या १०७-औरंगाबाद (मध्य) मतदारसंघांतर्गत येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मतदार जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. प्रभा खैरे, डॉ. विनोद मुंदडा, आयएमएच्या डॉ. उज्ज्वला दहिफळे, डॉ. श्रीनिवास गडाफ, डॉ. सुरेश सारवडे, स्वीप अधिकारी संजीव सोनार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थी जिवनात विद्यार्जन करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. त्याच प्रमाणे आपल्या जीवनासाठी आपल्या समाजासाठी लोकशाहीचे संवर्धन आणि जतन करणे हे सुद्धा आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी युवकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदान करणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी युवकांनी जागरुक असायला हवे. विद्यार्थी दशेत असतांना विद्यार्थ्यंनी आपल्या भवतालच्या सार्वजनिक प्रश्नात लक्ष घालून पर्यावरण रक्षण, प्रदूषण नियंत्रण, वृक्षरोपण अशा विविध विषयांत विद्यार्थ्यांनी कार्यरत असणे आवश्यक आहे. आपल्या आई वडील, गुरुजनांचा आदर करणे, सुसंस्कारित होणे यासारख्या बाबी ह्या व्यक्तिमत्व विकासाला पूरक असतात. या संस्कारांपासून दुर जाणाऱ्या पिढीला संस्कारक्षम बनवून देश, राज्य आणि समाजाभिमुख युवक घडविणे हे आजच्या शिक्षक आणि पालकांचे उद्दिष्ट असायला हवे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. अर्चना दरे यांनी केले.

# बुद्ध शिकवण स्विकारले नाही तर आपले जीवन व्यर्थ-भदन्त डॉ. सुमनवण्णो महाथेरो




**छत्रपती संभाजीनगर (अजिंक्य केसरी) :** भदन्त बोधिपालो महाथेरो यांच्यासह भिक्खुसंघाचा कठिण चिवरदानाचा कार्यक्रम लोकुत्तरा महाविहार येथे उपासक उपासिकांनी शुक्रवार दि १८ ऑक्टोबर २०२४ येथे उत्साहात संपन्न झाला.

या समारंभास धम्म मंचावर अखिल भारतीय भिक्खु संघाचे महाराष्ट्र सचिव भदन्त डॉ. सुमनवण्णो महाथेरो (चंद्रपूर),भदन्त भदन्त डॉ. हर्षबोधी महाथेरो भदन्त काश्यप महाथेरो,भिक्खु करूणानंद थेरो, भिक्खु अत्तदिप थेरो,भिक्खु मनायु थेरो (डोंगरगाव), भिक्खु रत्नदिप थेरो भिक्खु विपस्सी थेरो,भिक्खु एन. धम्मानंद भिक्खु अनुरूध्द,भिक्खु सचित्तबोधी, भिक्खु यशोदिप, भिक्खु धम्मानंद,भिक्खु विणयशील, भिक्खु सुमेधबोधी, भिक्खु थिपधम्मो,भिक्खु धम्मशरण,भिक्खु संघानंद, भिक्खु कुलदिप, भिक्खु नागसेन, भिक्खु बी. राहुलो, भिक्खु धम्मरतन, भिक्खु उपाली, भिक्खु दिपंकर, श्रामणेर अश्वघोष, श्रामणेर रत्नबोधी,श्रामणेर इधीपय्यो, श्रमणेर महानाम, श्रामणेर धम्मरक्षित, श्रामणेर प्रसेनजीत,श्रामणेर भारद्वाज, श्रामणेर महानाम-२, भिक्खुनी आर्या,शासनप्रीती थेरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकुत्तरा महाविहाराचे सचिव भदंत काश्यप महाथेरो यांनी प्रास्ताविक केले. अखिल भारतीय भिक्खु संघाचे अनुसंघनायक भदंत बोधिपालो महाथेरो यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी सम्यक संकल्प यावर सखोल भाष्य केले.बुद्ध धम्माचा इतिहास थोडक्यात उधृत केला. ते म्हणाले आपण स्वतः वर प्रेम करायला शिकले पाहिजे. त्यामुळे आपल्यातील द्वेष राग मस्त्सर आपोआप कमी होतील. त्यामुळे जीवन सुखमय होईल.

समारोपीय धम्मदेसना भदन्त डॉ. सुमनवण्णो महाथेरो यांनी देसना दिली.त्यांनी मिथ्या दृष्टी आणि सम्यक दृष्टी यांच्यातील वैज्ञानिक दृष्टीकोन अतिशय साध्या सोप्या शब्दात समजावून सांगितला.ते म्हणाले बुद्ध शिकवण स्विकारली नाही तर आपले जीवन व्यर्थ आहे. सम्यकदृष्टी अंगिकारल्याने आपले जीवन सुखमयन होईल. आपल्या कडे जे आहे त्यात आपण समाधानी असेल पाहिजे. आपले

चित्त नेहमी शांत ठेवले पाहिजे. जो पर्यंत मिथ्या दृष्टी चित्तातून जात नाही तो पर्यंत जीवनात शांती येणार नाही.

धम्म देसना पुर्वी सकाळी धम्म ध्वजारोहण (पुजनीय भदन्त सुमनवण्णो महाथेरो चंद्रपूर यांच्या हस्ते) त्यानंतर भिक्खु संघास भोजनदान, दुपारी भिक्खु संघाचे स्वागत आणि संघदान, त्यानंतर भिक्खु संघाचा कठिण चिवरदान दुपारी १:०० वाजता भिक्खु संघाची धम्मदेसना झाली.

यावेळी विनिता सातदिवे, वसंतराव सातदिवे, आशा ताई अशोक येरेकर, आर ओ इंगळे, पुष्पा इंगळे, लक्ष्मी बाई सरकटे,वेणुताई कार्तिक, रघुनाथ कार्तिक, कामोद कार्तिक, राजेंद्र नन्नावरे, संगीता पाखरे, सुधा लेमाडे, विनोद ल माडे, व्ही के वाघ, नानासाहेब म्हस्के, अशोक कांबळे ,डॉ सागर चक्रनारायण, शोभाताई वाठोरे, मिना वानखडे, सुनंदा जाधव, शाहुबाई वाघमारे, रूखमाबाई गायकवाड, सुरेखताई गवई, सुनंदा बगाटे यांच्या सह शहरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# पहूर कसबे गावाच्या प्रवेशद्वारापाशी घाणीचे साम्राज्य !

## कित्येक वर्षांपासून नालीचा प्रश्न प्रलंबित ! ग्रामपंचायत सदस्यपती दिनकर पवार यांची ग्रामपंचायतकडे मागणी

**जामनेर (अजिंक्य केसरी) :** तालुक्यातील पहुर कसबे गावाच्या प्रवेशद्वारापाशी अर्थात पोळा दरवाजा जवळ घाणीचे साम्राज्य पसरले असून नालीचा प्रश्न कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे . गावातील सांडपाणी थेट रस्त्यावर येत असल्याने दुर्गंधी पसरली असून ग्रामस्थांच्या आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे . ही समस्या त्वरित दूर करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्यापती तथा सामाजिक कार्यकर्ते दिनकर भास्कर पवार यांनी केली आहे. बाबत अधिक माहिती अशी की, पहूर कसबे गावाच्या प्रवेशद्वारापाशी असलेली नाली नादुरुस्त झाल्याने नालीतील दुर्गंधीयुक्त पाणी थेट रस्त्यावर येत आहे. ही समस्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे. या ठिकाणी कचऱ्याचे व घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पहूर कसबे गावाकडून लेले नगरकडे जाणाऱ्या मार्गावर असणारा फरशी पूल देखील जागोजागी खड्ड्यांनी व्यापला आहे . प्रवेशद्वारा जवळील अंगणवाडीची इमारत मोडकळीस आलेली आहे. या ठिकाणचा परिसर सुशोभित करणे आवश्यक आहे मात्र ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्यापती दिनकर पवार यांनी केला आहे . प्रवेशद्वाराच्या बाहेर असणाऱ्या अंगणवाडीत जाण्यासाठी चिमुकल्यांना कसरत करावी लागत आहे . कोणत्याही प्रकारच्या पायऱ्या नसल्याने चिमुकल्यांना त्रास होत असून प्रवेशद्वारापासून स्मशानभूमीपर्यंतचा रस्ता पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने अंत्ययात्रेत सहभागी झालेल्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागत आहे.

> ‘सदर नालीचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल. या नालीच्या कामासाठी इंजिनियर गरुड यांना माहिती दिली आहे ल वकरच हे काम मार्गी लागेल.’
>
> **- अशोक बाविस्कर**
> ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत पहूर कसबे, ता. जामनेर जि. जळगाव



# लोहा विधानसभा मतदारसंघात पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल नाही: 21 जणांचे 53 नामनिर्देशन पत्र खरेदी

**लोहा (अजिंक्य केसरी)**
**अंबादास पवार**

लोहा विधानसभा मतदार संघात पहिल्याच दिवशी एकही नामांकन अर्ज दाखल झाला नाही पण २१ जणांनी ५३ नामनिर्देशन पत्र घेतले आहेत अशी माहिती निवडणुक निणऱ्य अधिकारी उपविभागीय अधिकारी अरूणा संगेवार यांनी दिली.

विधानसभा निवडणूक प्रक्रियेत नामनिर्देशन दाखल करण्यास आज पासून प्रारंभ झाला आहे. दाखल करण्यास आज पासयून प्रारंभ झाला आहे. सुट्टीचे दिवस वगळता २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ३० ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी तर ४ नोंव्हेबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. मतदान २० नोंव्हेबर रोजी होणार आहे.स्वतंत्र कक्ष स्थापण करण्यात आला असून तेथे नामांकन खरेदी, तपासणी व स्वीकारले जाणार आहेत.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी तसेच निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे पाल न व्हावे. यासाठी सर्वांनी जबाबदारी पार पाडावी असे निवडणूक निणऱ्य



अधिकारी अरूणा संगेवार यांनी सुचना दिल्या आहेत. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसिलदार विठ्ठल परळीकर, तहसिल दार,कंधार रामेश्वर गोरे, नायब तहसिलदार उर्मिल ा कुलकर्णी, रेखा चामनर, संदीप हाडगे, अशोक मोकले, राजेश पाठक,राजेश गायंगी सहाय्यक महूसल अधिकारी, श्रिनिवास ढगे,हरिराम राऊत,तिरूपती मुंगरे, ईश्वर धुळगंडे,मन्मथ थोटे, अशोक मोरे,महेंद्र कांबळे,बी.बी.शेख. विल ास चव्हाण, सूर्यकांत पांचाळ, दयानंद मळगे, मुनींत गायकवाड, यासह कर्मचारी निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**२१ जणांचे ५३ अर्ज विक्री.**

पहिल्याच दिवशी २१ जणांनी ५३ अर्जाची विक्री झाली आहे. माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.श्यामसुंदर शिंदे, प्रविण पाटील चिखलीकर, प्रा.मनोहर धोंडे, एकनाथ पवार, शिवा नंरगले, रंगनाथ भुजबळ, आशाताई शिंदे, रामचंद्र येईलवाड सतिष पाटील उमरेकर या प्रमुख उमेदवारांचा यात समावेश आहे.

पहिला नामांकन अर्ज खरेदी संजय भालेराव यांनी केला त्या शिवाय आनंदा नवघरे विनायक लोहकरे (शेलगाव) किशन डफडे (कंधार) निलेश गोरे (कंधार) ग्यानोबा घोडके (पानभोसी) शेख रहिमान सतार, बालाजी चुक्कलवाड (पाताळगंगा) रंगनाथ गजले (निळा) भारत कोपनर (पांगरी) योगेश इंगळे(निळा) बालाजी गाडेकर (बरळी) हरि पाटील शिंदे (हळदव) प्रदीप चिखल ीकर (चिखली) ज्ञानेश्वर चोंडे बालाजी एकलारे, दिंगबर उगले, सय्यद नईम, खादर मामु लदाम (लोहा) यांचा समावेश आहे.

# शेतातील सोयाबीनचे झाले प्रचंड नुकसान शेतकऱ्यांच्या तोंडचे पळाले पाणी परतीच्या पावसाने हिरावले शेतकऱ्यांचे स्वप्न

**मालेगाव (अजिंक्य केसरी)**
**प्रकाश भुरे**

मालेगाव व तालुक्यासह शेती व्यवसायाला धक्के बसले तरी शेतीचे अर्थचक्र कधीही रूतून बसले नाही शेतकरी आपल्या कामात कधी खंड पडू देत नाही हे विशेष आहे त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था हेलकावे खात असली तरी तग धरून आहे परतीचा पाऊस अवकाळी पूरसदृश स्थिती हे शब्द शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजले आहेत परतीच्या पावसाने झोडपून काढले तालुक्यासह परिसरात रतीचा पाऊस दमदार कोसळला राजाने छळले नवऱ्याने मारले, पावसाने झोडपले तर दाद कोणाकडे मागायची अशी अवस्था निसर्गाच्या तांडवात अडकलेल्या शेतकऱ्यांची झाली आहे सलग पावसाने बेजार केल्यानंतर आता तरी पावसापासून सुटका होईल, दिवाळीत सोयाबीन पीक घरात येईल, असे स्वप्न शेतकऱ्यांनी रंगविले होते मात्र परतीच्या पावसाने गेल्या काही दिवसांपासून धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्यांचे स्वप्नच हिरावले गेले परिसरातील शेतीचा सर्वाधिक भाग पावसावर अवलंबून आहे मात्र हवामानातील बदलांमुळे शेतीचे नुकसान होत आहे शेती उत्पादनामध्ये चढउतार होण्याचे मुख्य कारण अतिशय कमी किंवा अत्यधिक पाऊस हेच आहे. सध्या शेती व्यवसाय हा जुगाराच्या डावासारखा झाला आहे. शेतमालाची शाश्वती नाही. बाजारभावाचा पत्ताच लागत नाही. त्यात मागणी वाढली तर शेतीमालाला भाव मिळतो. अन्यथा नेहमीच पुरवठा वाढीचा फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. शेती क्षेत्रात महागाईने कळस गाठला आहे. मशागती, मजुरी, औषध फवारणी आदींचा खर्च करूनही शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही. त्यामुळे उत्पादन खर्चाचे गणित आणि मिळणारा बाजारभाव यात जमीन अस्मानचा फरक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात आर्थिक तफावत कारणीभूत ठरत आहे



## ऑक्टोबर हिटचा तडाखा

ऑक्टोबर हिट आणि परतीच्या पावसाची एकच गाठ पडली. खरीप हंगामात दमदार पाऊस झाल्याने पिकांची वाढ जोरदार झाली. त्यात जुलैपासून पावसाचा खंड पडला होता. त्यानंतर सप्टेंबर पासून जोरदार परतीचा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे यंदा खरिपाचे पीक वाया जात आहे. पावसाळ्याचे चक्रच बदलत आहे. त्याचा परिणाम शेतीवर होत

## थो । ड । क्या । त

### वैजापुरात पहिल्याच दिवशी १० जणांनी घेतले १९ उमेदवारी अर्ज

**वैजापुर (अजिंक्य केसरी) :** वैजापूर विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मंगळवारपासून नामनिर्देशन पत्र/उमेदवारी अर्ज देण्याची प्रक्रिया निवडणूक विभागाकडून सुरू झाली आहे. शहरातील विनायकराव पाटील महाविद्यालयात निवडणूक निणऱ्य अधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड सहाय्यक निवडणूक निणऱ्य अधिकारी सुनील सावंत यांच्या उपस्थितीत पहिल्याच दिवशी २३ ऑक्टोबर रोजी १० इच्छुक उमेदवारांनी १९ अर्ज निवडणूक लढवण्यासाठी घेतल्याची माहिती निवडणूक विभागाकडून मिळाली आहे. नामनिर्देशन पत्र सकाळी ११ ते ३ या वेळेत देण्यात येणार आहेत. २९ ऑक्टोबर हा नामनर्देशन पत्र उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. नामनिर्देशन पत्रांचे विक्री वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पहिल्या दिवशी यांनी घेतले अर्ज डॉ. दिनेश परदेशी, शिल्पा परदेशी (ठाकरे गट) बाबासाहेब पगारे (बहुजन समाज पार्टी), ज्ञानेश्वर घोडके (वंचित बहुजन आघाडी किंवा अपक्ष), नबी वजीर पटेल (अपक्ष), मंजाहरी गाढे (अपक्ष), डॉ.राजीव डोंगरे(अपक्ष),भागवत कुर्मदास निकम(अपक्ष), प्रशांत दादासाहेब सदाफळ (अपक्ष)

### अंगणात काम करताना वानराने घेतला महिलेच्या पाठीचा चावा

**लोहा (अजिंक्य केसरी) :**मागिल कांहीं महिन्यापूर्वी वानराच्या टोळक्याने लोहा शहरात दहशत निर्माण करून अनेकांना चावा घेतल्याने नागरिकात भीती निर्माण झाली होती. मात्र वन विभाग कर्मचाऱ्यांनी सापळा लावून कांहीं वानराना जेरबंद केले होते. मात्र कांहीं कालावधी नंतर पुन्हा वानर हैदोस सुरू झाला असून अंगणात काम करणाऱ्या महिलेच्या पाठीचा वानराने चावा घेवून गंभीर जखमी केल्याची घटना दि. १९ रोजी दुपारी घडली.

जुना लोहा शहरातील कलाल पेठ भागात स्थानिक रहिवाशी महिला रेखा राजु गोडबोले या दि. १९ रोजी दुपारी अंगणात घरकाम करत असताना अचानक एका वानराने सदर महिलेवर हल्ला चढवून पाठीला कडाडून चावा घेतला घाबरलेल्या महिलेने अरडा ओरडा केल्याने वानर तेथून पळून गेले. मात्र सदर हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केले असून त्यांची प्रकृती ठीक असल्याचे सांगण्यात आले. सद्य परिस्थितीत शहरात वानर हैदोस मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांनी छतावर घातलेले वाळवण उध्वस्त करणे, त्यांचे नुकसान करणे असे प्रकार वाढले आहेत. सदरील प्रकार रोखण्यासाठी वन विभागाने कार्यवाही करावी अशी मागणी शहर वशियातून होत आहे.

### रिसोड मध्ये महायुती चे तिकीट कुणाला ?; भाजप, शिवसेना (शिंदे गट) राष्ट्रवादी (अजित पवार गट) सारेच लागले कामाला

**मालेगाव (अजिंक्य केसरी) :** विधानसभेचा निवडणुकीचा बिगुल वाजला असून आपल्या मतदारसंघात कोणत्या पक्षाकडून कोण उभे राहणार मित्रपक्षा पैकी कोणाला जागा सोडणार याच्याबद्दल तालुक्यात सगळीकडे चर्चा सुरू आहे अद्यापही नाव जाहीर न झाल्याने नागरिक संभ्रमात आहेत तर दुसरीकडे सगळेच नेते आपापला प्रचार करताना दिसत आहे

सध्याच्या परिस्थितीमध्ये मालेगाव तालुक्यात विधानसभा निवडणुकी वरून बऱ्याच चर्चा रंगवल्या जात आहेत विशेष म्हणजे महायुतीमध्ये असलेल्या भाजपा शिवसेना राष्ट्रवादी चे रिसोड मालेगाव विधानसभा आमदारकीचे स्वप्न पाहणारे गाव तांडे पिंजून काढत आहेत व आपल्या कार्यकर्तेच्या भेटी घेत आहेत यावेळेस दावेदारी आपली आमदार मीच होणार अशीच भूमिका घेत आहेत याबद्दल गावात वेगवेगळ्या चर्चा ऐकावयास मिळत आहे महायुती सरकारमधील हे तीनही जण आप आपला दावा रिसोड मालेगाव विधानसभेवर करत आहे त मात्र उमेदवारी कोणाला जाहीर होणार हे अद्यापही गुल दस्त्यातच आहे पक्षनिष्ठांना न्याय मिळणार का नवीन आल्यांना तिकीट मिळणार की बंडखोरी होणार की बाजी तीसराच मारनार आणि आमदार तोच होणार अशी चर्चा ऐकवयास मिळत आहे सर्वच पक्षाचे कार्यकर्ते आपापल्या नेत्याचा शोशलमीडिया वर प्रचार करत आहेत .

*काँग्रेसमध्ये वन मॅन आर्मी अमित झनक*

*एकीकडे भाजप शिंदे गट अजितदादा गट यांच्यापैकी कोणाला जागा सुटणार कोणाला तिकीट मिळणार हे अजूनही गुलदस्त्यात असताना दुसरीकडे मात्र काँग्रेस उबाटा गट तसेच शरद पवार गट एकत्र असताना काँग्रेसमध्ये वन मॅन आर्मी म्हणून अमित झनक हे उमेदवार फायनल असल्याचे बोलल्या जाते.*

### दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांना ‘सक्षम ॲप’ ठरणार मदतगार

बुलडाणा : आगामी विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुलभ रीतीने मतदान करण्यास मदत व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने सक्षम नावाचे मोबाईल ॲप तयार केले आहे. या ॲपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मुलभुत सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. या सुविधेचा सर्व पीडब्लूयूडी(पर्सनल व्हीथ डिसॲबेलिटी) मतदारांनी आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून मतदारांसाठी दिलेला सोयी सुविधा प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक **समाधान तुकाराम वाणी** यांनी सोलापूर तरूण भारत मिडीया लि., ए-३२,औरंगाबाद इंडस्ट्रीयल को.ऑप.,सोसायटी, रेल्वे स्टेशन, एमआयडीसी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महा.) ४३१००५, येथे मुद्रित करुन मानिकनगर, नारेगाव, छत्रपती संभाजीनगर (महा). ४३१००७ मो.:**९८८१९५२५१०** येथे प्रकाशित केले आहे. इमेल dailyajinkyakesari@gmail.com आरएनआय.एमएएचएमएआर/२०२३/८७४७९

Printed, Published and Owned by **SAMADHAN TUKARAM WANI** Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd. A-32, Aurangabad Indstrial.Co.Op. Society railway Station , MIDC, Station Road, Chhatarapati Sambhajinagar(MH) 431005 and Published at Manik Nagar, Naregaon, Chhatarapati SambhajiNagar, (MH). 431007 Mob.: **9881952510** Email - dailyajinkyakesari@gmail.com **RNI. MAHMAR/2023/87479**